'जय सहकार'

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

## अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे

नोंदणी क्र. - टि एन् ए / यु. एल. आर / आर. एस. आर / (सी. आर) / ३७४ / सन ८९-९०

– कार्यालय –

१५२९ 'परिश्रम' महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पूर्व) जि. ठाणे. पीन - ४२१५०१.

"सहकारात ऐपतीपेक्षा पतीला महत्व आहे"

स्थापना :
२८ ऑगस्ट १९८९

"शुभ चिंतावे शुभ इच्छावे वचनी शुभ बोलावे
शुभ कर्माच्या सामर्थ्याने करावे जीवनाचे सोने"

| | |
|---|---|
| सभासद संख्या | ६७४ |
| भाग भांडवल | ७,६०,८१० |
| अधिकृत भाग भांडवल | १०,००,००० |
| मुदत ठेव | १,६७,००० |
| कर्ज वाटप | ८,२२,००० |
| खेळते भांडवल | १२,७५,३५८ |
| वार्षिक उलाढाल | १२,१९,६०३ |

# ६ वा वार्षिक अहवाल

## सन १९९४-९५

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

## – संचालक मंडळ –

| | |
|---|---|
| श्री. जयवंतराव बंडू काटकर (विशेष कार्यकारी दंडाधिकारी) | अध्यक्ष |
| श्री. अनंतराव नारायण आंबरे (बी. ए.) | उपाध्यक्ष |
| श्री. हणमंतराव सदाशिव घनवट | सेक्रेटरी |
| श्री. भिमराव यशवंतराव सुर्यवंशी (बी. कॉम) | खजिनदार |
| श्री. सुभाष शामराव भावसार | संचालक |
| श्री. अविनाश नारायण खानविलकर | –,,– |
| श्री. अशोक तुकाराम चौधरी | –,,– |
| श्री. भालचंद्र यशवंतराव माने | –,,– |
| श्री. प्रकाश शंकर पाटील | –,,– |
| सौ. नलिनी कृष्णाजी यशवंतराव | –,,– |
| श्री. संजय जगन्नाथ दरेकर | –,,– |
| श्री. भगवान अर्जून उतेकर | –,,– |
| श्री. हरिश्चंद्र यशवंत येरुणकर | –,,– |

## – अंतर्गत हिशोब तपासणीस –

श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव
बी. कॉम.

श्री. विजय अमृत पाटील
बी. कॉम.

## – कायदेशीर सल्लागार –

ॲडव्होकेट : **श्री. सुहास गडकरी**, कल्याण

## – कर्मचारी वर्ग –

**श्री. रतनलाल दादासाहेब घनवट**

**श्री. नाथा बाबुराव लोटके**

**श्री. केशव शंकर दरेकर**

'जय सहकार'

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

**अंबरनाथ, जि. ठाणें.**

हिशोब तपासणी वर्ग 'अ'

## – जाहीर नोटीस –

**(फक्त सभासदांकरिता)**

दिनांक १७-६-१९९५

संस्थेंच्या सर्व सभासदांस कळविण्यांत येते की, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दिनांक** २३-७-९५ रोजी दुपारी ४ वाजता महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ (पश्चिम) येथे आयोजित केली आहे. तरी सर्वांनी वेळेवर हजर रहावे.

## —: सभेपुढील कामे :—

१) अध्यक्षांची निवड.
२) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) सन १९९४–९५ चा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजुरी घेणे.
४) सन १९९४–९५ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
५) सन १९९५–९६ सालाकरीता अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड करणें व त्यांचे मानधन ठरविणें
६) सन १९९४–९५ चा वैधानिक हिशोब तपासणीसांचा अहवाल वाचन.
७) मुदत ठेवीबाबत चर्चा करणे.
८) सन १९९५–९६ चे अंदाज पत्रकास मंजुरी घेणे.
९) पोट नियम दुरुस्तीस मान्यता घेणे.
१०) सन ११९५–९६ ते १९९९–२००० साठी निवडून आलेल्या संचालक मंडळाचा निकाल जाहीर करणे.
११) आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांचे परवानगीने चर्चा करणे.

**श्री. हणमंत सदाशिव घनवट**
सेक्रेटरी

---

**टिप –**

१) सभासदांनी आपल्या सुचना अगर प्रश्न संस्थेच्या कार्यालयात दि. १५-७-९५ पर्यंत लेखी पाठवाव्यात.
२) सर्व सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा
३) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकुब झाल्यास, सभा अर्ध्या तासाने, त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, त्याच विषयांवर सभेच्या कामकाजास सुरुवात होईल व त्यास गणपूर्तीचे बंधन रहाणार नाही.
४) सर्व सभासदांस कळविण्यात येते की, ज्यांनी आपला सन ९२–९३ व ९३–९४ चा लाभांश घेतला नसेल त्यांनी तो संस्थेच्या ऑफीसमधून घेऊन जावा, अन्यथा तो राखीव निधीत जमा केला जाईल.

'विना सहकार नही उद्धार'

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

## : सहावा वार्षिक अहवाल :

## सन १९९४–९५

❋

सन्माननीय सभासद बंधु-भगिनिनो,

सप्रेम नमस्कार वि. वि.

माणसाच्या जीवनात सहकाराला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. खास करुन मध्यम वर्गीयांच्या प्रगतीचा कणा जर असेल तर तो 'सहकार' कारण मध्यम वर्गीयांना मर्यादित उत्पन्नामुळे आणि आकाशाला गवसणी घालणाऱ्या वाढत्या महागाईमुळे त्याला नेहमीचे जीवन जगणें कठीण झाले आहे; त्याचे माणूस म्हणून जगणें दुरापास्त झाले आहे. अशा स्थितीत त्याला सहकाराशिवाय माणूसच काय पण प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा वाचवू शकत नाही. म्हणूनच म्हटले आहे की, 'विना सहकार नही उद्धार' आणि ते सार्थ आहे. ही ग्यानबाची मेख ज्याच्या लक्षात आली, जे कामाला लागले ते आज सहकार महर्षी म्हणून ओळखले जातात की ज्यांनी असंख्य कुटुंबाना सहकाराचे महत्व पटवून त्यांचे जीवन उज्वल बनविले, पर्यायाने गांव, राज्य व देशाच्या प्रगतीस हातभार लावला हे लक्षात घेऊन आपण लावलेल्या या रोपट्याला विचारांचे, आचाराचे आणि कृतीशिलतेचे खतपाणी घालून त्यास महाकाय वृक्षात रुपांतर करण्याची प्रतिज्ञा करुया.

आज आपल्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचा ३१ मार्च ९५ अखेरचा वार्षिक अहवाल, संस्थेची सांपत्तीक स्थिती दर्शविणारे तेरीज पत्रक, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके आपल्या समोर सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. संस्थेने या सहकार वर्षात केलेली नेत्रदिपक प्रगती हे आपण केलेल्या सहकार्याचे संचालक मंडळाने घेतलेल्या अथक परिश्रमाचे फळ आहे व त्याची रास आपल्या समोर ठेवणे हे मी माझे अद्य कर्तव्य समजतो. त्याचबरोबर आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.

सभासद, ठेवीदार, मार्गदर्शक व हितचिंतक यांनी केलेल्या निर्भेळ प्रेम, अतूट विश्वास, केलेलं अनमोल मार्गदर्शन आणि दिलेले आशिर्वादाने संस्थेची झालेली प्रगती पाहून मला सार्थ अभिमान वाटतो.

संस्थेने केलेली प्रगती खालील तक्त्यावरुन आपल्या निदर्शनास येईल.

| नं. | तपशील | १९९१–९२ | १९९२–९३ | १९९३–९४ | १९९४–९५ |
|---|---|---|---|---|---|
| १ | सभासद | ६८४ | ६७२ | ६६८ | ६७४ |
| २ | भाग भांडवल | ४,१८,४७० | ५,१९,७७० | ६,१८,७२० | ७,६०,८१० |
| ३ | ठेंवी | ४,२३,५०० | २,७७,००० | १,३७,००० | १,७७,५८३ |
| ४ | कर्ज | ११,६९,००० | ६,७९,२०० | ७,९७,७०० | ८,२२,००० |
| ५ | खेळते भांडवल | १०,५०,९५०–२५ | १०,३६,८६२–०० | १०,४९,७७६ | १२,७५,३५८ |
| ६ | | – | – | – | – |
| ७ | | – | – | – | – |
| ८ | नफा | ७०,८०४–२५ | ९०,०४१–७५ | ९३,३८१ | १,१८,९०९ |

**ठेवी –**

ठेवी हा आपल्या संस्थेचा पाया आहे. तो मजबुत असल्यामुळेच आजतागायत संस्थेने बँक कर्ज घेतले नाही. संस्थेची होत असलेली प्रगतीरुपी घोडदौड ठेवींच्या भक्कम कण्यावर चालू आहे. अहवालसाली संस्थेंकडें एकूण रुपयें १,७७,५८३/– मुदत ठेंव रुपाने जमा आहे.

**कर्ज –**

सभासदांच्या अडीअडचणी लक्षात घेंऊन संस्थेंने सभासदांना वेळोवेळी सुलभ हप्त्याने पतपुरवठा करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. सभासदांच्या गरजा भागवून त्यांचे जीवनमान उंचावणें, त्यांच्यात बचतीची भावना रुजवून सहकाराची लागण करण्याच्या सदिच्छेंने संस्थेंने अहवालसाली रु. ८,२२,०००/– एवढा पतपुरवठा केला आहे.

**नफा –**

संस्थेंने अत्यंत परिश्रम पूर्वक कष्ट घेंऊन सन १९९४–९५ या सहकार वर्षात संस्थेंस एकूण नफा रुपयें १,१८,९०९/– मिळवून दिला आहे. सोबत नफ्याचा विनियोग तक्ता दिला आहे. त्यास आपण एकमुखी मंजुरी द्याल अशी अपेक्षा आहे.

**सभा –**

अहवालसाली संचालक मंडळाच्या एकूण १३ सभा झाल्या शिवाय दैनंदिन कामकाज आणि संस्थेंच्या उन्नत्तीच्या दृष्टीने विचार विनिमय करण्यासाठी सायंकाळी ७ ते ९ या वेळात पदाधिकारी व संचालक कार्यालयात हजर असतात.

**श्रद्धांजली –**

सस्थेंचे अध्यक्ष मा. जयवंतराव काटकर यांच्या मातोश्री, श्री. परशुराम बाबु कदम यांच्या मातोश्री, यांना व अशा ज्ञात व अज्ञातांच्या निधनाबद्दल संस्थेंच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

**आभार –**

संस्थेंस खालील मान्यवरांचे निरंतर सहकार्य अनमोल मार्गदर्शन लाभले त्यांच्या सहकार्याबद्दल ऋणनिर्देश व्यक्त करणें हे माझें कर्तव्य समजतो.

मा. श्री. नकुल पाटील, माजी अध्यक्ष सिडको, श्री. दादासाहेब नलावडें, माजी नगराध्यक्ष अंबरनाथ, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व त्यांचे सहकारी; शाखाधिकारी टि. डि. सी. बँक अंबरनाथ; मा. चौधरीसाहेब

लेखा परिक्षक वर्ग १, मा. श्री. बुटाला, अप्पर उपलेखा परिक्षक, मा. श्री. घंसास साहेब, सहकारी संस्था उल्हासनगर, श्री. बाळासाहेब सोनजे, मुख्याध्यापक म. गांधी विद्यालय अंबरनाथ, श्री. रामराव मोरे, मुख्याध्यापक भाऊसाहेब परांजपे विद्यालय अंबरनाथ, श्री. वसंतराव मोहिरे, लेखाधिकारी मरावी मुंबई, श्री. एस. एस. भगत ज. मॅनेजर, मेकॉन इंजिनिअरींग कं. अंबरनाथ, श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव व श्री. विजय अमृत पाटील, अंतर्गत हिशोब तपासणीस आणि अनावधानाने राहिलेल्या अन्यांचे लाभलेले सहकार्य, अनमोल मार्गदर्शनाबद्दल त्यांचे हार्दिक आभार व अभिनंदन.

**समारोप –**

सहकारी संस्थांचा उत्कर्ष हा संस्थेच्या कर्जवसूलीवर अवलंबून असतो. आपल्या संस्थेंची कर्जवसूली आजपर्यंत शंभर टक्के होत आली आहे. ती कायम राखण्यासाठी आपण सर्व सभासद बंधु-भगिनींनी सहकार्य केले आहे आणि यापुढेंही ते करीत रहाल याचा मला ठाम विश्वास आहे. याप्रसंगी त्याचा आवर्जुन उल्लेख करणें मी माझे कर्तव्य समजतो. संस्थेंचा उत्कर्ष करणें हे आपणा सर्व सभासद बंधु - भगिनींच्या हाती आहे. ती जबाबदारी पार पाडण्याची आपण प्रतिज्ञा करुया. विशेषत: संचालक मंडळानेही आपली जबाबदारी स्विकारुन ती पार पाडण्यासाठी कसोशीने प्रयत्न करायला हवेत अशी अपेक्षा आहे.

माननीय सभासद बंधु - भगिनिनो आपण आम्हा संचालक मंडळावर जो अमोल विश्वास दर्शविला त्यास कोणत्याही प्रकारे गालबोट न लावता आपला नितांत आदर बाळगून संस्थेचा कारभार जबाबदारीने व निस्पृहतेने करु याची ग्वाही देऊन संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविणारा सन १९९४–९५ चा अहवाल, ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके संचालक मंडळाचे वतिने मी आपल्या समोर मंजुरीसाठी विनम्रतेने सादर करीत आहे. तरी त्यास आपणा सर्वांनी मंजुरी द्यावी, ही विनंती.

धन्यवाद,

जयहिंद – जय सहकार

**श्री. जयवंतराव बंडू काटकर**

अध्यक्ष

संचालक मंडळाचे वतीने

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

**अंबरनाथ, जि. ठाणे**

नोंदणी क्र – टि एन् ए / यु. एल. आर / आर. एस. आर / (सी. आर) /३७४/ सन ८९–९०

## तेरीज पत्रक नंबर १.

**दिनांक १–४–९४ ते दिनांक ३१–३–९५**

| जमा | रक्कम रुपये | | नांवे | रक्कम रुपये | |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक रोख | ४३९ | ०० | भाग भांडवल खाते | १६,७१० | ०० |
| बँक | २०६२ | ०० | कर्ज खाते | ८,२२,००० | ०० |
| भाग भांडवल | १,५८,८०० | ०० | व्याज खाते | २८,६४९ | ०० |
| कर्ज खाते | ६,८२,१२५ | ०० | मासीक ठेंव खाते | ९,१५० | ०० |
| व्याज खाते | २,२९,४१७ | ०० | छपाई व लेखन साहित्य | ६,४६० | ०० |
| मासीक ठेव खाते | ८,६७५ | ०० | इमारत निधी खाते | १० | ०० |
| मासीक ठेव कमिशन | २० | ०० | पोस्टेंज / टेंलीग्राम | ८८६ | ०० |
| छपाई लेखन साहित्य | २,१७६ | ०० | लाभांश खाते | ६१,८३५ | ०० |
| इमारत निधी | ६,३५७ | ०० | प्रवास खर्च खाते | १,५४३ | ०० |
| पोस्टेज | ३३ | ०० | किरकोळ खर्च खाते | ३,१८८ | ०० |
| प्रवेश फी | २६ | ०० | बँक व्याज | १२ | ०० |
| लाभांश | १९६ | ०० | अनामत खाते | १४ | ०० |
| बँक व्याज | ९४३ | ०० | मुदत ठेंव खाते | ९६,००० | ०० |
| बँक लाभांश | १५ | ०० | कर्मचारी वेतन/मदततीस मानधन | ३७,२०० | ०० |
| मुदत ठेव खाते | १,२६,००० | ०० | वार्षिक अकौंटिंग चार्जेस | २,००० | ०० |
| बँक कमिशन | ४ | ०० | सरकारी ऑडिट फी | २,०५० | ०० |
| नोटीस फी | २,३१५ | ०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | २४३६ | ०० |
| | | | शिक्षण निधी | १,०५० | ०० |
| | | | बँक कमिशन | १४ | ०० |
| | | | दैनंदिन ठेव खाते | १,३२० | ०० |
| | | | कर्मचारी सानुग्रह अनुदान | ४,२०० | ०० |
| | | | कायदेशीर सल्लागार फी | ४,१५६ | ०० |
| | | | सभासद भेंट वस्तू | २०,८०० | ०० |
| | | | ऑफीस भाडें | ३,००० | ०० |
| | | | संचालक मिटिंग भत्ता | ३,८७० | ०० |
| | | | आदेशिव स्टॅम्प | १,००० | ०० |
| | | | फिक्स डिपॉझिट | ८०,००० | ०० |
| | | | अंतरगंत हिशोब तपासणीस मानधन | २,००२ | ०० |
| | | | अखेंरची शिल्लक रोख | ४४१ | ०० |
| | | | बँक | ७,६०३ | ०० |
| एकूण | १२,१९,६०३ | ०० | एकूण | १२,१९,६०३ | ०० |

| | | |
|---|---|---|
| **श्री. भि. य. सुर्यवंशी** | **श्री. ह. स. घनवट** | **श्री. जयवंतराव वंडू काटकर** |
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

नोंदणी क्र. – टि एन् ए / यु. एल. आर / आर. एस. आर / (सी. आर) /३७४/ सन ८९–९०

## उत्पन्न–खर्च पत्रक नंबर २.

दिनांक १–४–९४ ते दिनांक ३१–३–९५

| खर्च तपशील | रक्कम | | उत्पन्न तपशील | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| छपाई व लेखन साहित्य | ६,४६० | ०० | सभासद कर्जावरील व्याज | २,२९,४१७ | ०० |
| पोस्ट व टेलीग्राम | ८८६ | ०० | मासीक ठेंव कमिशन | २० | ०० |
| प्रवास खर्च | १,५४३ | ०० | छपाई व लेखन साहित्य | २,१७६ | ०० |
| किरकोळ खर्च | ३,१८८ | ०० | पोस्टेज / टेलीग्राम | ३३ | ०० |
| बँक चार्जेस | २६ | ०० | बँक लाभांश | १५ | ०० |
| कर्मचारी वेतन | ३७,२०० | ०० | बँक व्याज | ९४३ | ०० |
| अकौंटिक चार्जेस | १,००० | ०० | बँक कमिशन | ४ | ०० |
| देणे ऑडिट फी | २,३२६ | ०० | नोटीस फी | २,३१५ | ०० |
| देणे शिक्षण निधी | १,२७५ | ०० | | | |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | २,४३६ | ०० | | | |
| डेडस्टॉक झीज | ८४० | ०० | | | |
| कायदेशीर सल्लागार फी. | ४,१५६ | ०० | | | |
| सभासद भेट वस्तू | ८०० | ०० | | | |
| ,, देणे | २०,००० | ०० | | | |
| ऑफीस भाडे | ३,००० | ०० | | | |
| संचालक सभा भत्ता | ३,८७० | ०० | | | |
| अंतर्गत हिशोब तपासणीस मानधन | २,००२ | ०० | | | |
| देणे ठेवीवरील व्याज | २०,८०६ | ०० | | | |
| देणे कर्मचारी बोनस | ४,२०० | ०० | | | |
| चालू नफा | १,१८,९०९ | ०० | | | |
| एकूण रुपये | २,३४,९२३ | ०० | एकूण रुपये | २,३४,९२३ | ०० |

| श्री. भि. य. सुर्यवंशी | श्री. ह. स. घनवट | श्री. जयवंतराव बंडू काटकर |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

नोंदणी क्र. – टि एन् ए / यु. एल. आर / आर. एस. आर / (सी. आर) /३७४/ सन ८९–९०

## — नफा विभागणी पत्रक —

## सन १९९४–९५

| अ नं. | तपशील | | नफा विभागणी रक्कम | एकूण नफा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मागील शिल्लक नफा | ४७९ | | १,१९,३८८ ०० |
| २ | + चालू सालचा नफा | १,१८,९०९ | | |
| ३ | वजा – २५% राखीव निधी | | २९,७२७ ०० | |
| ४ | २% लाभांश समीकरण निधी | | २,३७८ ०० | |
| ५ | इमारत निधी | | ३,५०० ०० | |
| ६ | सभासद कल्याण निधी | | २,००० ०० | |
| ७ | संशयीत / बुडीत कर्ज निधी | | ३,५०० ०० | |
| ८ | धर्मदाय निधी | | १,००० ०० | |
| ९ | रौप्य महोत्सव निधी | | १,००० ०० | |
| १० | १०% लाभांश वाटप | | ७६,०८१ ०० | |
| ११ | शिल्लक नफा | | २०२ ०० | |
| | | एकूण रुपये | १,१९,३८८ ०० | १,१९,३८८ ०० |

| श्री. भि. य. सुर्यवंशी | श्री. ह. स. घनवट | श्री. जयवंतराव बंडू काटकर |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी

नोंदणी क्र. – टि एन् ए / यु. एल. आर / आर. एस. आर /

## ताळेबंद पत्रक नंबर ३

| रक्कम ३१-३-९४ | | कर्ज व देणे | रक्कम | | रक्कम ३१-३-९५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| १०,००,००० | ०० | अधिकृत भाग भांडवल | | | १०,००,००० | ०० |
| ६,१८,७२० | ०० | वसुल भाग भांडवल | | | ७,६०,८१० | ०० |
| ४५,१५९ | ०० | राखीव निधी - मागील शिल्लक | ४५,१५९ | ०० | ७२,१९१ | ०० |
| | | सन १९९३-९४ | २३,३४५ | ०० | | |
| | | सन १९९१-९२ चा लाभांश वर्ग | ३,६६१ | ०० | | |
| | | अधिक प्रवेश फी | २६ | ०० | | |
| | | **निधी –** | | | | |
| ३५,२०८ | ०० | इमारत निधी | ४४,०५५ | ०० | ९६,०३६ | ०० |
| १२,०७० | ०० | लाभांश समीकरण निधी | १३,९३८ | ०० | | |
| ६,२१३ | ०० | धर्मदाय निधी | ७,७१३ | ०० | | |
| ४,५१५ | ०० | सभासद कल्याण निधी | ६,५१५ | ०० | | |
| १३,८१५ | ०० | संशयित व बुडीत कर्ज निधी | १७,३१५ | ०० | | |
| ५,५०० | ०० | रौप्य महोत्सव निधी | ६,५०० | ०० | | |
| | | **ठेवी –** | | | | |
| १,३७,००० | ०० | मुदत ठेव | १,६७,००० | ०० | १,७७,५८३ | ०० |
| २,१०३ | ०० | दैनंदिन ठेव | ७८३ | ०० | | |
| १०,०७५ | ०० | मासिक ठेव | ९,६०० | ०० | | |
| २०० | ०० | बचत ठेव | २०० | ०० | | |
| | | **देणी व तरतुदी –** | | | | |
| २,००० | ०० | देणे ऑडीट फी | २,२७६ | ०० | ४९,३५० | ०० |
| १,०५० | ०० | देणे शिक्षण निधी | १,२७५ | ०० | | |
| १८,१४३ | ०० | देणे ठेवीवरील व्याज | १०३,०० | ०० | | |
| १,००० | ०० | देणें अकौंटिंग चार्जेस | – | | | |
| ४,८०० | ०० | देणें कर्मचारी बोनस | ४,८०० | ०० | | |
| १४,१२६ | ६० | देणे लाभांश | १०,६९९ | ०० | | |
| २०,००० | ०० | देणे भेट वस्तू | २०,००० | ०० | | |
| १४ | ०० | देणे अनामत | | | | |
| | | **नफा - तोटा खाते –** | | | | |
| | | चालू नफा | | | | |
| ९८,०६४ | ४० | मागील शिल्लक नफा | १,१८,९०९ | ०० | १,१९,३८८ | ०० |
| | | | ४७९ | ०० | | |
| १०,४९,७७६ | ०० | एकूण रुपयें | | | १२,७५,३५८ | ०० |

श्री. भि. य. सुर्यवंशी
खजिनदार

श्री. ह. स. घनवट
सचिव

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष

# पतपेढी मर्यादित

(सी. आर) /३७४/ सन ८९-९०

**दिनांक ३१ मार्च ९५**

| रक्कम ३१-३-९४ | | जिंदगी व येणे | रक्कम | | रक्कम ३१-३-९५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४३९ | ०० | रोख शिल्लक | | | ४४५ | ०० |
| २,०६२ | ०० | ठाणे जि. म. सह. बँक शिल्लक | | | ७,६०३ | ०० |
| ७,४०० | ०० | गुंतवणूक – | | | ८७,४०० | ०० |
| | | ठाणे जि. म. सह. बँक शेअर्स | १०० | ०० | | |
| | | मुदत ठेव – राखीव निधी | ७,३०० | ०० | | |
| | | मुदत ठेव | ८०,००० | ०० | | |
| १०,३१,४७५ | ०० | सभासद दिर्घ मुदत कर्ज | | | ११,७१,३५० | ०० |
| | | अॅडेसिव्ह स्टॅम्प | | | १,००० | ०० |
| ८,४०० | ०० | डेड स्टॉक | ८,४०० | ०० | ७,५६० | ०० |
| | | वजा १०% घसारा | ८४० | ०० | | |
| १०,४९,७७६ | ०० | एकूण रुपये | | | १२,७५,३५८ | ०० |

**श्री. भि. य. सुर्यवंशी**
खजिनदार

**श्री. ह. स. घनवट**
सचिव

**श्री. जयवंतराव बंडू काटकर**
अध्यक्ष

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

नोंदणी क्र. – टि एन् ए / यु. एल. आर / आर. एस. आर / (सी. आर) /३७४/ सन ८९–९०

## — अंदाज पत्रक —

## सन १९९५–९६

| जमा तपशील | अंदाजें उत्पन्न १९९५–९६ | | खर्च तपशील | अंदाजें खर्च १९९५–९६ | |
|---|---|---|---|---|---|
| सभासद कर्जावरील व्याज | २,३५०,०० | ०० | छपाई व लेखन साहित्य | ५,००० | ०० |
| प्रवेश फी | ५० | ०० | किरकोळ खर्च | ३,५०० | ०० |
| बँक लाभांश | १५ | ०० | प्रवास खर्च | २,००० | ०० |
| बँक व्याज | १४,००० | ०० | टपाल खर्च | १,००० | ०० |
| | | | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ३,००० | ०० |
| | | | संचालक सभा भत्ता | ४,६०० | ०० |
| | | | सरकारी हिशोब तपासनीस फी | २,५०० | ०० |
| | | | शिक्षण निधी | १,३०० | ०० |
| | | | कर्मचारी वेतन / मेहनताना | ३८,००० | ०० |
| | | | अंतर्गत हिशोब तपासनीस फी | २,००० | ०० |
| | | | जाहिरात खर्च | १,५०० | ०० |
| | | | ठेवीवरील व्याज | २५,००० | ०० |
| | | | ऑफीस भाडें | ३,६०० | ०० |
| | | | सचिव मानधन | ३,००० | ०० |
| | | | भाग परत | २५,००० | ०० |
| | | | नफा | १,२८,०६५ | ०० |
| एकूण रुपये | २,४९,०६५ | ०० | एकूण रुपयें | २,४९,०६५ | ०० |

**श्री. भि. य. सुर्यवंशी**
खजिनदार

**श्री. ह. स. घनवट**
सचिव

**श्री. जयवंतराव बंडू काटकर**
अध्यक्ष

# सभासदांना सूचना

१) आपल्या पत्त्यात बदल झाल्यास तो बदल लेखी स्वरुपात संस्थेस कळवावा, म्हणजे पत्रव्यवहारास सुलभ होईल.
२) सभासदास वारस नेमता येतो. ज्यांनी वारसाची नोंद केली नसेल त्यांनी रीतसर अर्ज करुन वारस नेमावेत व भविष्यातील अडचणी टाळाव्यात.
३) आपली पत आणि पतसंस्थेचा दर्जा वाढविण्यासाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते आणि भाग वर्गणी नियमित भरुन संस्थेस सहकार्य करावे व त्याचा फायदा लाभांश रुपाने मिळवावा.
४) पतपेढीचे काम सहकारी कायदा अधिनियम–नियम यांना अनुसरुन करावे लागते; तेव्हा आपल्या व्यवहारा संबंधीत काही अडचण असल्यास ती समजाऊन घेऊन व्यवस्थापक मंडळास सहकार्य करावे.
५) कर्ज घेण्यासाठी विश्वासु तिघांचा गट करा व त्यात सहसा बदल करु नका.
६) पतपेढीकडून कर्ज मिळविणे हा उद्देश न ठेवता आपल्या मिळकतीतून बचत करा व ठेव ठेवा.
७) सभासद झाल्यापासून सहा महिन्यानंतर, सभासद कर्ज मागणीस व जामिन राहण्यास पात्र ठरेल.
८) कर्ज मंजुरीसाठी दोन जामिनदारांची आवश्यकता राहील. सोबत त्यांची पगार पत्रके व अर्जदाराचे पगार पत्रक आवश्यक राहील.
९) सभासद हा फक्त दोन कर्जदारांना जामिन राहू शकेल.
१०) कर्जाची परतफेड कमाल ३६ हप्त्यात करावी लागेल.
११) कर्ज घेते वेळी कर्जदार दोन्ही जामिनदारासह प्रत्यक्ष हजर रहाणें आवश्यक आहे.
१२) कर्जाचे हप्ते व वर्गणी भरतेवेळी आपले पासबूक सोबत आणावे व भरुन घ्यावे.

## – संस्थेची उद्दीष्टे –

१) सभासदामध्ये प्रामाणिकपणा, काटकसर, स्वावलंबन व सहकाराची भावना रुजविणे.
२) सभासदांना त्यांच्या संकटकाळी, आपत्तीच्या काळात मदत करणें.
३) आपल्या सहकार्यातून सभासदांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लावणे.
४) सभासदामध्ये अल्पबचतीची सवय निर्माण करुन भविष्यातील अडचणीवर मात करण्यास मदत करणे.
५) वाजवी शर्तीवर कर्ज मिळवून देण्यास मदत करणे.
६) वरील उद्दीष्टांच्या पूर्ततेंसाठी इतर कामे हातीं घेणे.

## – आवाहन –

प्रिय सभासद बंधु-भगिनींना विनम्र आवाहन ! मी पतपेढीचा अध्यक्ष या नात्याने आपणा सर्वांना आवाहन करु इच्छितो की, आपली ही विशाल उद्दीष्टे साध्य करावयाची असतील तर मोठ्या भांडवलाची आवश्यकता आहे. आपल्या गरजा भागविणे सोईचे व्हावे म्हणून आपण स्वत:, आपले मित्र व स्नेही यांचेकडून ठेवीद्वारे जास्तीत जास्त भांडवल उभारण्यासाठी आपल्या अनेक हातांच्या सहकार्याची अपेक्षा बाळगतो आपल्या ठेवीवर आकर्षक व्याज दिले जाईल. तरी माझ्या सभासद बंधु आणि भगिनिंनो आपण योग्य प्रतिसाद द्याल ही अपेक्षा.

जयहिंद !

**श्री. जयवंतराव बंडू काटकर**
अध्यक्ष

# पोट नियम दुरुस्ती

| पोट नियम | सद्याचे पोट नियम | पोट नियम दुरुस्ती | दुरुस्तीचे कारण |
| --- | --- | --- | --- |
| अ. २-१ | संस्थेचे कार्यक्षेत्र साधारणतः अंबरनाथ शहरापुरते मर्यादित राहील. | संस्थेचे कार्यक्षेत्र साधारणतः उल्हासनगर नगर-तालुका क्षेत्रापुरते मर्यादित राहील. | संस्थेचे कामकाज व होणारा उत्कर्ष पाहून लोकांना संस्थेचे सभासद होण्या-बद्दल होणारी कुचंबणा टाळण्यासाठी. |
| आय. १-३ | ई) वरील प्रमाणे नफा वाटणी झाल्यानंतर मूळ नफ्याची उरलेली रक्कम व्यवस्थापक समितीच्या मुखत्यारीत खालील प्रमाणे वाटण्यांत येईल<br>१) शे. २५ टक्के इतकी रक्कम सर्व सदस्यांना त्यांच्या संस्थेंतील मागील सहकारी वर्षाच्या मुदती-तील एकत्र (Cumulative) आणि किंवा कायम निधीतील रकमांवर त्यांना जें काही व्याज मिळाले असेल, त्या प्रणाणांत आणि ऋणको सदस्यांना (Barrowing Members) त्यांना भरणा केलेल्या व्याजाच्या प्रमाणात (Bonus) अधिला-भांश म्हणून वाटण्यात येईल.<br><br>२) शें. २० टक्के इमारत निधी.<br>३) शे. १० टक्के संस्थेच्या नोकरवर्गाला बोनस देण्याकरीता. परंतु नोकराचा बोनस त्यांच्या २ महिन्याच्या पगारापेक्षा जास्त नसावा. | ई) वरीलप्रमाणे नफा वाटणी झाल्यानंतर मूळ नफ्याची उरलेली रक्कम व्यवस्थापक समितीच्या मुखत्यारीत खालील प्रमाणे वाटण्यात येईल.<br><br>१) शे. २५ टक्के इतकी रक्कम सर्व सद-स्यांना त्यांच्या संस्थेंतील मागील सहकारी वर्षाच्या मुदतीतील एकत्र (Cumula-tive) आणि किंवा कायम निधीतील रकमांवर त्यांना जे काही व्याज मिळाले असेल त्या प्रमाणांत आणि ऋणको सदस्यांना (Barrowing Members) त्यांना भरणा केलेल्या व्याजाच्या प्रमाणात (Bon-us) अधिलाभांश म्हणून वाटण्यात येईल.<br><br>२) शे. २०% इमारत निधी. | १) सभासदांत संस्थेबद्दल आपुल-कीची भावना वाढीस लागावी.<br><br>२) सभासदांना उत्पन्नाचा अधिकात अधिक लाभ होऊन त्याच्यात संस्थे-बद्दल आत्मीयता वाढीस लागावी.<br><br>३) सभासदांत संस्थेचे व्यवहार निय-मित / सुरळीत पार पाडण्याबाबतची भावना निर्माण होऊन संस्थेंच्या उत्कर्षांत भर पडावी म्हणून. |

| पोट नियम | सद्याचे पोट नियम | पोट नियम दुरुस्ती | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| आय. १-३ | ४) सभासद कल्याण निधी उभारतां येईल, व तो साधारण सभेत ठरविल्या प्रमाणे १०% राहील.<br><br>५) शें. १०% बुडीत कर्ज निधी ३० जूनला येंणे असलेल्या थकित कर्जावर काढता येईल.<br><br>६) शे. २५ टक्के सर्वसाधारण सभेकडे (General Body) संस्थेच्या व्यवहारात सहाय्यक किंवा सहकाराच्या वाढीसाठी आणि अधिनियम व नियमांच्या उपबंधास आधीन राहून इतर धर्मदाय कारणासाठी खर्च करण्याकरिता ठेवावी. | ३) शे. १०% संस्थेंच्या नोकरवर्गाला बोनस देण्याकरीता. परंतु नोकरांचा बोनस त्यांच्या २ महिन्याच्या पगारापेक्षा जास्त नसावा.<br><br>४) सभासद कल्याण निधी उभारता येईल. व तो साधारण सभेत ठरविल्याप्रमाणें १०% राहील-<br><br>५) शे. १० %बुडीत कर्ज निधी ३१ मार्चला येणे असलेल्या थकीत कर्जाविर काढता येईल.<br><br>६) सर्व तरतुदी झाल्यानंतर नफ्याच्या २०% इतकी रक्कम सभासदांना भेंटवस्तु-साठी खर्च करण्याचा अधिकार संचालक मंडळाच्या सभेंस राहील.<br><br>७) शे. ५ टक्के सर्वसाधारण सभेंकडे (General Body) संस्थेंच्या व्यवहारात साहाय्यक किंवा सहकाराच्या वाढीसाठी आणि अधिनियम व नियमांच्या उपबधास आधीन राहून इतर धर्मदाय कारणांसाठी खर्च करण्याकरिता ठेवावी. | |

# सहकारी लेखा परिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५–ब) आणि
महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित या संस्थेचा सोबत जोडलेला ३१ मार्च ९५ या दिनांकाचा ताळेबंद व सन १९९४–९५ या सहकारी वर्षाचे नफा-तोटा पत्रक तपासले असून अहवाल करितो की,

१) मी त्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे/माहितीप्रमाणें व विश्वासाप्रमाणे खालील जरुर ती सर्व माहिती व खुलासा मला उपलब्ध झाला आहे.

२) माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाश्याचे आधारे,

अ) ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकांशी जुळते असून सदर ३१ मार्च ९५ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व रास्त स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची तोटयाची सत्य व रास्त स्थिती दर्शवितो.

ब) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीत पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

४) सन ९४–९५ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

स्थळ : अंबरनाथ
दिनांक : १७–६–९५

**अे. जी. बुटाला**
(अप्पर उपलेखा परिक्षक. सहकारी संस्था, उल्हासनगर)

**टिप :–** वर नमूद केलेल्या दाखलयामध्यें काही बाबी नकारात्मक शेऱ्यास पात्र असल्यास अशा बाबीची कारणे लेखापरिक्षण अहवालांत नमूद करावीत.

**BOOK-POST**

प्रेषक –

**श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित**
अंबरनाथ, जि. ठाणे.

१५२९ 'परिश्रम', महालक्ष्मी नगर,
अंबरनाथ (पूर्व) - ४१२५०१ जि. ठाणे.